॥श्री स्वामी समर्थ॥

# ***श्री स्वामी समर्थ सेवा व आध्यात्मिक विकास मार्ग (दिंडोरी प्रणीत )***

## Ĥ श्री गुरुपौर्णिमा उत्सव माहिती पत्रक Ĥ

## Ħ पूजन साहित्य Ħ

*** सामूहिक केंद्राने आणावयाचे साहित्य** -

हळद ,कुंकू ,अष्टगंध ,अक्षता ,फूल ,हार ,स्वामींची मूर्ती ,चौरंग ,पाट ,कोरा कापड ,नेपकीन 2 ,नारळ ,कापूर ,अत्तर ,नागवेलीची पाने 2 ,खारीक ,बादाम ,सुपारी ,दक्षिणा ,तांब्या ,ताम्हण ,पळी ,पाणी ,पंचामृत (दूध ,दही ,तूप ,मध ,साखर) ,दिवा ,अगरबत्ती ई.

*** सर्वानी आणावयाचे साहित्य ***

हळद ,कुंकू ,अष्टगंध ,अक्षता ,फूल , नारळ , खड़ीसाखर ,दक्षिणा इ.

*पूजेची पूर्वतयारी *

- सर्व प्रथम याज्ञिकींनि यजमान जोडप्याकडून स्वामींची षोडशोपचार पूजा करून घ्यावी.
- महाराजांच्या मूर्तिवर सोळा वेळा श्री सूक्त व पुरुष सूक्त आणि एक वेळा पावमान सूक्ताचा अभिषेक करावा.

- **सामूहिक पूजा**

* यानंतर सर्वाकडून सामूहिक गुरुपूजन व संकल्प करून घ्यावा.

1.मंगल तिलक :-सर्व प्रथम पुरुषांना कपाळी अष्टगंध व महिलांना हळदी कुंकू लावायला सांगावे व खालील मंत्र म्हणावा.

ॐ भद्रं कर्णेभिः शृणुयाम देवा भद्रं पश्येमाक्षभिर्यजत्राः ।

स्थिरैरङ्गैस्तुष्टुवांसस्तनूभिर्व्यशेम देवहितं यदायुः ॥

ॐ स्वस्ति न इन्द्रो वृद्धश्रवाः । स्वस्ति नः पूषा विश्ववेदाः ॥

स्वस्तिनस्तार्क्ष्यो अरिष्टनेमिः । स्वस्ति नो बृहस्पतिर्दधातु ॥

ॐ शांति: शांति: शांति:॥

2.आचमन :-भगवान विष्णूंची पुढील नावे घेवुन आचमन करावे.

तीन नावानी पाणी पिऊन घ्यावे

१}ॐ केशवाय नमः  २}ॐ नारायणाय नमः  ३} ॐ माधवाय नमः

दोन नावानी पाणी सरळ हाताने ताम्हणात सोडावे.

४}ॐ गोविंदाय नमः  ५}ॐ विष्णवे नमः

हात जोडून बसावे.

६}ॐ मधूसूदनाय नमः  ७}ॐ त्रीवीक्रमाय नमः

८}वामनाय नमः  ९}ॐ श्रीधराय नमः

१०}ॐ हृषीकेशाय नमः  ११} ॐ पद्मनाभाय नमः

१२} ॐ दामोदराय नमः  १३}ॐ  संकर्शणाय नमः

१४} ॐवासुदेवाय नमः  १५} ॐ प्रद्यूम्नाय नमः

१६}ॐ अनिरुद्धाय नमः  १७}पुरुषोत्तमाय नमः

१८}ॐ अढोक्षजाय नमः  १९}नारसिन्हाय नमः

२०}ॐ अच्यूताय नमः  २१} ॐ जनार्दनाय नमः

२२} ॐ उपेंद्राय नमः  २३}ॐ हरये नमः

२४} ॐ श्रीकृष्ण परमात्मने नमः

3.प्राणायाम :-हातात पाणी घेवुन खालील संकल्प करावा.

ॐ प्रणवस्य परब्रह्म ऋषि:! परमात्मा देवता । देवी गायत्री छन्दः । प्राणायामे विनियोगः ॥

उजव्या हाताच्या मधल्या बोटांनी डावी नाकपुडि दाबून उजव्या नाकपुडिने श्वास घ्यावा , नाक बंद करून मनातल्या मनात गायत्री मंत्र म्हणावा व उजव्या नाकपुडिने श्वास सोडावा.

ॐ तत्सवितुर्वरेंयम् । भर्गो देवस्य धिमहि। धीयो योन : प्रचोदयात ॥

4.देवता स्मरण :- हात जोडून खालील प्रार्थना म्हणावी.

श्रीमन महागणाधीपतये नमः

श्री मातृपितृभ्यौ नमः

श्री कुलदेवताभ्यौ नमः

श्री इष्ट देवताभ्यो नमः

श्री ग्रामदेवताभ्यौ नमः

श्री स्थानदेवताभ्यौ नमः

श्री वास्तूदेवताभ्यौ नमः

श्री आदीत्यादी नवग्रह देवताभ्यौ नमः

एतकर्म प्रधान श्रीपाद श्रीवल्लभ श्री नृसिंहसरस्वती श्री गुरुदेवदत्त श्री स्वामी समर्थ महाराजाय नमः

अविघ्नमस्तू ,

सुमुखश्चैकदन्तश्च कपिलो गजकर्णकः

।

लम्बोदरश्च विकटो विघ्ननाशो

विनायकः ।। 3।।

धूम्रकेतुर्गणाध्यक्षो भालचन्द्रो

गजाननः ।

द्वादशैतानि नामानि यः

पठेच्छृणुयादपि ।। 4।।

विद्यारम्भे विवाहे च प्रवेशे निर्गमे

तथा ।

सङ्ग्रामे सङ्कटे चैव विघ्नस्तस्य न

जायते ।। 5।।

शुक्लाम्बरधरं देवं शशिवर्णं

चतुर्भुजम् ।

प्रसन्नवदनं ध्यायेत्

सर्वविघ्नोपशान्तये ।। 6।।

अभीप्सितार्थ-सिद्ध्यर्थं पूजितो यः

सुराऽसुरैः ।

सर्वविघ्नहरस्तस्मै गणाधिपतये

नमः ।। 7।।

सर्वमङ्गलमाङ्गल्ये शिवे

सर्वार्थसाधिके ! ।

शरण्ये त्रयम्बके गौरि नारायणि ! नमोऽस्तु ते ।। 8।।

सर्वदा सर्वकार्येषु नास्ति

तेषाममङ्गलम् ।

येषां हृदिस्थो भगवान् मङ्गलायतनो

हरिः ।। 9।।

तदेव लग्नं सुदिनं तदेव ताराबलं चन्द्रबलं तदेव ।

विद्यावलं दैवबलं तदेव लक्ष्मीपते तेऽङ्घ्रियुगं स्मरामि।। 10।।

लाभस्तेषां जयस्तेषां कुतस्तेषां

पराजयः ।

येषामिन्दीवरश्यामो हृदयस्थो जनार्दन ॥11॥

3.देशकालाचा उच्चार :-

श्रीमत भगवतो महापूरूसवष्य विष्णोराज्ञया प्रवर्तमानस्य अद्यास्मिन ब्रह्मांडे भूलोके ब्रह्मणो द्वितीये परार्धे विष्णुपदे श्री श्वेत वाराह कल्पे वैवस्वत मन्वंतरे अष्टाविशंतितमे युगे युगचतूस्के कलीयुगे प्रथमचरने जम्बूद्वीपे भरतवर्षे भरतखंडे दक्षिणापथे पुण्यक्षेत्रे बौद्धावतारे दंडककारण्ये देशे गोडावर्या उत्तर तीरे अमुक ग्रामे शालिवाहन शके ------,अमुकनाम सम्वत्सरे, अमुकायने, अमुकऋतौ, अमुकमासे, अमुकपक्षे, अमुकतिथौ, अमुकवासरे, अमुक दिवस नक्षत्रे ,अमुकराशिस्थिते श्रीसूर्ये, अमुकराशिस्थिते चन्द्रे, अमुकराशिस्थे देवगुरौ, शेषेषु ग्रहेषु यथायथाराशिस्थानस्थितेषु, सत्सु एवं गुण विशेषण विशिष्टायां शुभ पुण्य तिथौ.

4.संकल्प :-यानंतर सर्वांना हातात पाणी घ्यायला सांगावे व पुढीलप्रमाणे संकल्प करून घ्यावा.

मी अमुक गौत्रात उत्पन्न झालेला अमुक नावाचा मला श्रुति स्म्रुती शास्त्रोक्त श्री गुरुपूजनाचे फळ प्राप्त व्हावे म्हणून प्रायश्चित संकल्प करीत आहे.

माझ्या या जन्मातिल जन्म जन्मातरी ,बालपणी , तरुणपणी , प्रौढ असताना , म्हातारपणी माझ्याकडून , वाणी , डोळे , जीव्हा , इत्यादि इंद्रियांकडून ज्ञात अज्ञात , दृश्य अदृश्य , कायिक , वाचिक , मानसिक , आधिदैविक , अधीभौतीक , पाप घडले असेल , तसेच मी ब्राम्हण निंदा , गुरु निंदा , आई वडिलांची निंदा , देव निंदा , तीर्थ निंदा , वेद निंदा , शास्त्र निंदा केली असेल तसेच आई वडील व गुरु यांचेशी द्रोह केला असेल , परक्याची निंदा , आत्मस्तुती , वाईट गोष्टींना स्पर्श , अपूजनीय व्यक्तीचे पूजन , परधर्माची टीका , खोटे भाषण , वाईटाशी भाषण केले असेल , पापी लोकांशी संबध , परस्त्री (पुरुषा)बरोबर भाषण , परस्त्री (पुरुष) गमन , ब्रम्हदेव निषिद्ध आचरण केले असेल , शौचत्याग , संध्यात्याग , उपासना त्याग , तर्पण , बली वैश्वदेवत्याग , नित्यहोम त्याग , देवपूजा त्याग , गावाचा देशाचा त्याग , शास्त्र त्याग , आश्रम त्याग केला असेल अभक्ष खाल्ले असेल चोखन्यास अयोग्य चोखले असेल , उष्टें अन्न खाल्ले असेल , दूषित अन्न , परान्न , निंदनीय अन्न खाल्ले असेल तसेच काही लहान मोठे पाप व चुका माझ्याकडून घडल्या असतील त्या सर्व पापांचा नाश होवून माझे मन , शरीर , वाणी शुद्ध होण्यासाठी मी श्री स्वामी समर्थ महाराजांना आजपासून गुरु , सतगुरु , परमगुरु , पराप्तर गुरु , गुरु तत्व मानून त्यांची पंचोपचारे पूजा

करीत आहे.

* सर्वानी हात जोडून बसावे व खालील ध्यान करावे.

गूरूर्ब्रम्हा गुरुर्विश्णु गूरूर्देवो महेश्वर:।

गुरुर्साक्षात परब्रह्म तस्मै श्री गुरवे नमः ॥

ब्रम्हानंदम् परमसुखदम् केवलम् ज्ञानमूर्तीम् ।

द्वंद्वातीतम् गगनसदृशम् तत्वमत्स्यादीलक्षम् ।

एकम् नित्यम् विमलमचलम् सर्वधिसाक्षीभूतम् ।

भावातीतम् त्रिगुणरहितम् सतगूरूम् तं नमामी ॥

काषायवस्त्रम् करदंडधारिणम् कमंडलूम् पद्मकरेन शंखम् ।

चक्रम् गदा भूशीतम् भूषणाढ्यम् श्रीपादराजम् शरणम् प्रपद्ये ॥

1.स्वामींच्या मुर्तीला अष्टगंध लावावा.

श्रीपाद श्रीवल्लभ श्री नृसिंहसरस्वती श्री गुरुदेवदत्त भगवान श्री स्वामी समर्थ महाराजाय नमः

विलेपणार्थे चंदनम् समर्पयामि ॥

2.स्वामींच्या मुर्तीला अक्षता अर्पण कराव्या.

श्रीपाद श्रीवल्लभ श्री नृसिंहसरस्वती श्री गुरुदेवदत्त भगवान श्री स्वामी समर्थ महाराजाय नमः

अलंकारार्थे अक्षताम् समर्पयामि ॥

3.स्वामींच्या मुर्तीला फुले वहावीत.

श्रीपाद श्रीवल्लभ श्री नृसिंहसरस्वती श्री गुरुदेवदत्त भगवान श्री स्वामी समर्थ महाराजाय नमः

ऋतूकालौद्भव पुष्पांनी समर्पयामि ॥

4.स्वामींच्या मुर्तीला अगरबत्ती ओवालावि.

श्रीपाद श्रीवल्लभ श्री नृसिंहसरस्वती श्री गुरुदेवदत्त भगवान श्री स्वामी समर्थ महाराजाय नमः

धूपम् आघ्रपयामि ॥

5.स्वामींच्या मुर्तीला दिवा ओवालावा.

श्रीपाद श्रीवल्लभ श्री नृसिंहसरस्वती श्री गुरुदेवदत्त भगवान श्री स्वामी समर्थ महाराजाय नमः

दीपम् दर्शयामि ॥

6.स्वामींच्या मूर्ती समोर उजव्या हाताच्या मधल्या दोन बोटांनी चौकोन मंडल करावे त्यावर एक वाटीत खडिसाखर ठेवून त्यात तुलसी पत्र टाकावे व नैवेद्याला तीन वेळ तुळशीपत्राने गायत्री मंत्र म्हणत पाणी फिरवावे.

संत्यंत वर्तेण परीसिंचयामि ।

ॐ तत्सवितुर्वरेंयम् । भर्गो देवस्य धिमहि। धीयो योन : प्रचोदयात ॥

ॐ प्राणाय स्वाहा:। ॐ अपानाय स्वाहा:। ॐ व्यानाय स्वाहा:। ॐ उदाणाय स्वाहा:। ॐ समानाय स्वाहा:। ॐ ब्रम्हने अम्रूतत्वाय स्वाहा :।

नंतर तुळशी पत्र स्वामींसमोर ठेवावे.

नंतर हातात पाणी घेवुन प्रायश्चित संकल्प करावा.

अनेंन मया यथा ज्ञानेन यथा मीलीतोपचार द्रव्ये ध्यानम् आवाहनादी कृत पूजनेन श्रीपाद श्रीवल्लभ श्री नृसिंहसरस्वती श्री गुरुदेवदत्त भगवान श्री स्वामी समर्थ महाराज परमेश्वर प्रियताम् न मम ।

## *श्री गुरु पूजन झाल्यावर खालील प्रार्थना म्हणावी*

अनंतकोटी ब्रम्हांडनायक राजाधिराज योगिराज परब्रह्म श्री स्वामी समर्थ महाराज_मी आपले चरणी विनंती करून प्रार्थना करीत आहे. आजपासून माझे माता पिता गुरु सर्व काही आपणच आहात. आजपासून आपण मला आपला शिष्य बनवून आपण माझे गुरु व्हावे व मला गुरुपदी लीन करावे व माझा सर्वार्थाने सांभाळ करावा.

माझे गुरु , सतगुरु , परमगुरु , पराप्तर गुरु , गुरुतत्व सर्व काही आपणच आहात म्हणून आपण माझा शारीरिक , मानसिक , प्रापंचिक , आर्थिक , दैविक , आधिदैविक , भौतिक , आधीभौतिक , धार्मिक , आध्यात्मिक , पारमार्थिक , सर्वतोपरी सांभाळ करावा व योग्य शिष्य परंपरेचे मला ज्ञान देवून माझ्यावर अनुग्रह करावा.

मी दररोज श्री स्वामी चरित्रसारामृताचे 3 अध्याय वाचून 11माळा॥ श्री स्वामी समर्थ ॥ मंत्र जप करेल. आठवड्यातून तीन आरत्याना केंद्रात उपस्थित राहून दरमहा 11 सेवेकरी घड़ीवेल व सेवा केंद्रात होणाऱ्या सामूहिक सेवेत सहभागी राहील व आपले कार्य तन मन धनाने निस्वार्थिपने निरहंकारीपणे करेन. आपणाला भूषानावह होईल असे वागेन. असे आपणास साक्षी ठेवून संकल्प करीत आहे. आपण मला योग्य शिष्य परंपरेचे ज्ञान देवून माझ्यावर अनुग्रह करावा अशी मी विनम्रपणे पुन्हा त्रिवार मुजरा करून आपल्या चरणी प्रार्थना करीत आहे.

### * पूजन झाल्यावर तीर्थ घेण्याचा मंत्र *

अकाल मृत्यु हरणम् । सर्व व्याधी विनाशनम् ।

श्री गुरुपादोदक (श्री स्वामी समर्थ पादोदक) तीर्थम् जठरे धारयाम्यहम् । शिरसा धारयाम्यहम् ॥

सबसे बड़ा गुरु गुरु। से बड़ा गुरु का ध्यास ॥

***********************************